ऐसें ऐकतां वागुत्तर । अवश्य म्हणे श्रीशंकर । मग तो तेथूनि जालिंदर । गजापाशीं पातला ॥

Transliteration

Aise aikataa vaag-uttaru | Avashya mhane Shree-shankaru | Maga toh tethuuni Jaalindaru | Gajaapaashee paatalaa ||

Ovee 109

परी मोहनास्त्र प्रतापवंत । सर्व अंगे गज झाला शांत । निकट जाऊनि तयाचे त्वरित । आदरोक्ती बोलतसे ॥

Transliteration

Paree Mohanaastra prataapa-vantu | Sarva ange gaja jhaalaa shaantu | Nikata jaauuni tayaache tvaritu | Aadaroktee bolatase ||

Ovee 110

म्हणे बा रे धीरपण । कोणी नसे तुजसमान । तुझे कर्णी दिव्यरत्न । महासिद्धीनें निर्मिलें ॥

Transliteration

Mhane baa re dheerapanu | Konee nase tuja-samaanu | Tujhe karnee divya-ratnu | Mahaa-siddheene nirmile ||

Ovee 111

हांक मारुनि बोले त्यातें । म्हणे प्रबुद्ध नारायण समर्थ । गजकर्णी होऊनि व्यक्त । अवतारदीक्षा मिरविसी ॥

Transliteration

Haanka maaruni bole tyaate | Mhane Prabuddha Naaraayana samarthu | Gaja-karnee houuni vyaktu | Avataara deekshaa miravisee ||

Ovee 112

तरी आतां झडकरी । कर्ण सोडूनि ये बाहेरी । तूतें नाम या देहापरी । कर्णकानिफा साजतसे ॥

Transliteration

Taree aataa jhada-karee | Karna soduuni ye baaheree | Toote naama yaa dehaa-paree | Karna-kaaniphaa saajatase ||

Ovee 113

ब्रह्मवीर्य कर्णउत्पत्ती । म्हणूनि नाम तुजप्रती । तूं तव कानिफा सर्वज्ञमूर्ती । दृश्यमान होई कां ॥

Transliteration

Brahma veerya karna-utpattee | Mhanuuni naama tuja pratee | Too tava Kaaniphaa sarvajnya-moortee | Drishya maana hoee kaa ||

Ovee 114

ऐकूनि जालिंदराचें वचन । बोलता झाला विधिनंदन । हे महाराजा गुणनिधान । स्थिर असा महीतें ॥

Transliteration

Aikuuni Jaalindaraache vachanu | Bolataa jhaalaa vidhi nandanu | Hey Mahaaraajaa guna-nidhaanu | Sthira asaa maheete ||

Ovee 115

मग त्वरें येऊनि कर्णद्वारीं । दृष्टीं पाहे ब्रह्मचारी । सहज करुनि उभयकरीं । नमस्कारी प्रेमानें ॥

Transliteration

Maga tvare yeuuni karna-dvaaree | Drishtee paahe Brahmachaaree | Sahaja karuni ubhaya karee | Namaskaaree premaane ||

Ovee 116

षोडशवर्षी वयमान । बाळतनू देदीप्यमान । तयाचे तेजें सकळ कानन । तेजामाजी डवरलें ॥

Transliteration

Shodasha-varshee vayamaanu | Baala tanoo daedeepya-maanu | Tayaache teje sakala kaananu | Tejaa maajee davarale ||

Ovee 117

मग जालिंदरे देऊनि हस्त । खालीं उतरिला कर्णसुत । स्कंधीं वाहूनि प्रेमें स्नेहभरित । शिवापाशीं पातला ॥

Transliteration

Maga Jaalindare deuuni hastu | Khaalee utarilaa karna-sutu | Skandhee vaahuuni preme sneha-bharitu | Shivaa-paashee paatalaa ||

Ovee 118

स्कंधींचा उतरुनि ठेवी महीशीं । म्हणे कानिफा सर्वज्ञराशी । नमस्कारीं उमावरासी । वीर्यवंता महाराजा ॥

Transliteration

Skandheenchaa utaruni thevee maheeshee | Mhane Kaaniphaa sarvajnya-raashee | Namaskaaree Umaa-varaasee | Veerya-vantaa Mahaaraajaa ||

Ovee 119

त्यातें नमूनि जनकासमेत । द्विमूर्धनी आजी तात । त्यातें नमस्कारुनि त्वरित । श्रेयवंत होई कां ॥

Transliteration

Tyaate namuuni janakaa-sametu | Dvi-moordhanee aajee taatu | Tyaate namaskaaruni tvaritu | Shreya-vanta hoee kaa ||

Ovee 120

मग शिवासी करुनि नमस्कार । उपरी नमिला वैश्वानर । त्याहूनि प्रीती अति थोर । जालिंदर नमिलासे ॥

Transliteration

Maga Shivaasee karuni namaskaaru | Uparee namilaa Vaishvaanaru | Tyaahuuni preetee ati thoru | Jaalindara namilaase ||

Ovee 121

उपरी अत्यंत स्नेहभरितीं । शिवें कवळूनि सप्रेम हस्तीं । आपुले अंकीं बाळमूर्ती । कर्णकानिफा बैसविला ॥

Transliteration

Uparee atyanta sneha-bharitee | Shive kavaluuni saprema hastee | Aapule ankee baala moortee | Karna-kaaniphaa baisavilaa ||

Ovee 122

परम प्रिय अति लालन । घेतलें बाळाचें चुंबन । मग जालिंदरा बोले वचन । बाळा देई अनुग्रह ॥

Transliteration

Parama priya ati laalanu | Ghetale baalaache chumbanu | Maga Jaalindaraa bole vachanu | Baalaa daee anugrahu ||

Ovee 123

तव अनुग्रह झाल्यापाठीं । मोडेल अज्ञानदशाराहाटी । सकळार्थ विजय पोटीं । कर्णकानिफा मिरवेल ॥

Transliteration

Tava anugraha jhaalyaa-paathee | Modela ajnyaana-dashaa-raahaatee | Sakala artha vijaya-potee | Karna-kaaniphaa miravelu ||

Ovee 124

जैसा होतां अर्कोदय । अंधकार पावे विलय । तैं सकळ जनांचे हे व्यवसाय । तन्न्यायें बाळा करावें ॥

Transliteration

Jaisaa hotaa arkodayu | Andhakaara paave vilayu | Tai sakala janaanche hey vyavasaayu | Tannyaaye baalaa karaave ||

Ovee 125

कीं द्रव्य असतां गृही भरतीं । मग सकळ व्यवसाय तया सुचती । तन्न्यायें कृपामूर्ती । बाळालागी करावें ॥

Transliteration

Kee dravya asataa grihee bharatee | Maga sakala vyavasaaya tayaa suchatee | Tannyaaye kripaa moortee | Baalaa laagee karaave ||

Ovee 126

ऐसें ऐकूनि आदिनाथवचन । जालिंदर तो तुकावी मान । मग तोचि घडी क्रियामंडन । संकल्पांत आव्हानी ॥

Transliteration

Aise aikuuni Aadinaatha vachanu | Jaalindara toh tukaavee maanu | Maga techi ghadee kriyaa-mandanu | Sankalpaanta aavhaanee ||

Ovee 127

तन मन धन काया वाचा । त्याग केला दुर्गुणांचा । तो संकल्प निःसंकल्प साचा । गुरुराज वंदिला ॥

Transliteration

Tana mana dhana kaayaa vaachaa | Tyaaga kelaa durgunaanchaa | Toh sankalpa nihsankalpa saachaa | Gururaaja vandilaa ||

Ovee 128

मग वरदहस्त स्पर्शोनि चंद्रमौळी । कर्णी ओपिली मंत्रावळी । तेणें सकळ अज्ञानकाजळी । फिटोनि गेली तत्काळ ॥

Transliteration

Maga varada-hasta sparshoni chandra-maulee | Karnee opilee mantraavalee | Tene sakala ajnyaana-kaajalee | Phitoni gelee tatkaalu ||

Ovee 129

जैसा सदनीं लावितां दीप । तीव्र तमाचा होय लोप । तेवीं मंत्रबीजमाप । अज्ञानकर्दमपण निवटी कां ॥

Transliteration

Jaisaa sadanee laavitaa deepu | Teevra tamaachaa hoya lopu | Tevee mantra-beeja-maapu | Ajnyaana-kardama-pana nivatee kaa ||

Ovee 130

व्यक्ताव्यक्त सकळ भास । पूर्ण झाला विजयपणास । मग चराचरीं माझाचि वास । एके रुपें वर्ततसे ॥

Transliteration

Vyaktaa-vyakta sakala bhaasu | Poorna jhaalaa vijaya-panaasu | Maga charaacharee maajhaachi vaasu | Eke rupe bhartatase ||

Ovee 131

ब्रह्मदृष्टी संकलित खूण । दृश्यगुरुमुखेंकरुन । तें हरि रुद्र ब्रह्मरुप चैतन्य । ऐक्यरुपें मीनलें ॥

Transliteration

Brahma drishtee sankalita khoonu | Drishya-guru-mukhen-karunu | Tey Hari Rudra Brahma rupa chaitanyu | Aikyarupe meenale ||

Ovee 132

असो ऐशी होतां राहाटी । मग उठते झाले चतुर्थ जेठी । पदीं चालतां महीपाठीं । बद्रिकाश्रमीं पातले ॥

Transliteration

Aso aishee hotaa raahaatee | Maga uthate jhaale chaturtha jethee | Padee chaalataa mahee paathee | Badrikaa-Ashramee paatale ||

Ovee 133

मग सुवचनीं द्विमूर्धन । युक्ती सांगे जालिंदराकारण । बा रे जें कां दत्तवचन । कानिफातें समर्पी ॥

Transliteration

Maga su-vachanee Dvimoordhanu | Yuktee saange Jaalindaraa-kaaranu | Baa re je kaa Datta vachanu | Kaaniphaate samarpee ||

Ovee 134

ऐसें सांगूनि स्वयें युक्ती । अदृश्य झाला दाहकमूर्ती । वरी सादृश्यपणें उमापती । षण्मासें त्यातें मिरवला ॥

Transliteration

Aise saanguuni svaye yuktee | Adrishya jhaalaa Daahaka-moortee | Varee saa-drishyapane Umaapatee | Shanmaase tyaate miravalaa ||

Ovee 135

परी षण्मासदिनांमाझारी । दत्तकृपेची विद्यालहरी । सांठवूनि कानिफाअंतरी । केला भांडारी विद्येचा ॥

Transliteration

Paree shanmaasa-dinaam-maajhaaree | Datta-kripechee vidyaalaharee | Saanthavuuni Kaaniphaa-antaree | Kelaa bhaandaaree vidyechaa ||

Ovee 136

सकळ अस्त्रीं केला प्रवीण । परी संजीवनी अस्त्र देदीप्यमान । आणि दुसरें वाताकर्षण । जालिंदरें रक्षिलें असे ॥

Transliteration

Sakala astree kelaa praveenu | Paree Sanjeevanee astra daedeepya-maanu | Aani dusare Vaataa-karshanu | Jaalindare rakshile ase ||

Ovee 137

म्हणाल करुनि रक्षण । सांगितलें सकळ विद्येचें कारण । तरी इतुकेंच रक्षावयास संशय कोण । जालिंदरा उदेला हो ॥

Transliteration

Mhanaala karuni rakshanu | Saangitale sakala vidyeche kaaranu | Taree itukencha rakshaa-vayaasa sanshaya konu | Jaalindaraa udelaa ho ||

Ovee 138

तरी संशयाचें कारण । गजकर्णी झाला जन्म । तया स्थानींचा उत्तम गुण । उभयतांचा मिरवेल ॥

Transliteration

Taree sanshayaache kaaranu | Gaja-karnee jhaalaa janmu | Tayaa sthaaneenchaa uttama gunu | Ubhaya-taanchaa miravelu ||

Ovee 139

दांभिक बुद्धिसंस्कार । पाहूनियां जालिंदर । वाताकर्षण संजीवनीमंत्र । अस्त्र भिन्न रक्षिलें ॥

Transliteration

Daambhika buddhi-sanskaaru | Paahuuniyaa Jaalindaru | Vaataa-karshana Sanjeevanee mantru | Astra bhinna rakshile ||

Ovee 140

परी सकळ अस्त्रीं झाला निपुण । मग बोलता झाला उमारमण । अस्त्र देवता करुनि प्रसन्न । कानिफातें देई कां ॥

Transliteration

Paree sakala astree jhaalaa nipunu | Maga bolataa jhaalaa Umaa-ramanu | Astra devataa karuni prasannu | Kaaniphaate daee kaa ||

Ovee 141

मग स्तवनास्त्र जपोनि त्वरित । बोलाविले सकळ दैवत । इंद्र वरुण आश्विनीसहित ।
महीलागीं उतरले पातले ते ठाया ॥

Transliteration

Maga Stavana-astra japoni tvaritu | Bolaavile sakala daivatu | Indra Varuna aashvinee-sahitu | Mahee-laagee utarale paatale tey thaayaa ||

Ovee 142

दानव मानव प्रतापवंत । अतळ वितळ पाताळीं जे विख्यात । नवनागकुळें वंशवंत । तेही पातले ते ठाया ॥

Transliteration

Daanava maanava prataapa-vantu | Atala Vitala (Paataalee) je vikhyaatu | Nava-naaga-kule vamsha vantu | Tehee paatale tey thaayaa ||

Ovee 143

चंद्रसूर्य गणगंधर्व । यक्ष किन्नर आले सर्व । विष्णुसहित कामोद्भव । महींलागीं उतरले ॥

Transliteration

Chandra-soorya gana-gandharvu | Yaksha Kinnara aale sarvu | Vishnu-sahita kaamod-bhavu | Mahee-laagee utarale ||

Ovee 144

खगेंद्रासहित प्लवंगम । येता झाला दाशरथी राम । अवतारदक्ष विष्णु दशम । दशअवतारीं मिरवला ॥

Transliteration

Khagendraa-sahita Plavangamu | Yetaa jhaalaa Daasharathee Raamu | Avataara daksha Vishnu dashamu | Dasha-avataaree miravalaa ||

Ovee 145

बावन्न वीर जळदेवता । शंखिनी डंखिनी कालिकेसहिता । अष्टभैरव गण पाताळनाथ । गजानन मिरवला ॥

Transliteration

Baavanna veera jala-devataa | Shankhinee Dankhinee Kaalike-sahitaa | Ashta Bhairava gana Paataala-Naathu | Gajaanana miravalaa ||

Ovee 146

ऐशा देवता वर्णू किती । मृत्युलोकीं पूर्ण विख्याती । तेहतीस कोटी संख्या बोलती । दृश्य झाले तितुकेही ॥

Transliteration

Aishaa devataa varnu kitee | Mrityu-lokee poorna vikhyaatee | Tehateesa kotee sankhyaa bolatee | Drishya jhaale titukehee ||

Ovee 147

असो ऐशा समुच्चयाकारणें । त्यासी जालिंदर करी नमन । बद्धांजळी सर्वा जोडून । बोलता झाला त्तक्षणीं ॥

Transliteration

Aso aishaa samuchchayaa-kaarane | Tyaasee Jaalindara karee namanu | Baddhaanjalee sarvaa joduunu | Bolataa jhaalaa ttakshanee ||

Ovee 148

म्हणे महाराजा कृपामूर्ति । कानिफा मिरवला सद्विद्येप्रती । तैं योग देऊनि निगुतीं । कार्यालागीं वर्तावें ॥

Transliteration

Mhane Mahaaraajaa kripaa-moorti | Kaaniphaa miravalaa sadvidye-pratee | Tai yoga deuni nigutee | Kaaryaa laagee vartaave ||

Ovee 149

ऐसें ऐकूनि तयाचे वचन । दैवतें बोलती सकळ जाण । तुज आम्हीं वरप्रदान । सद्विद्येसी दिधलेसें ॥

Transliteration

Aise aikuuni tayaache vachanu | Daivate bolatee sakala jaanu | Tuja aamhee vara-pradaanu | Sad-vidyesee didhalese ||

Ovee 150

दिधलें परी कवणार्थी । श्रीपावकाच्या मोहाप्रती । आणि अत्रिसुत तुम्हांप्रति । विद्यानाथ झालासे ॥

Transliteration

Didhale paree kavana arthee | Shree-paavakaachyaa mohaa-pratee | Aani Atrisuta tumhaam-prati | Vidyaa-Naatha jhaalaase ||

Ovee 151

ऐसें उभयांच्या भिडेंकरुन । तुम्हासी दिधलें वरप्रदान । परी पुढें आणिका कारण । वर मिरवत नाहीं जी ॥

Transliteration

Aise ubhayaanchyaa bhide-karunu | Tumhaasee didhale vara-pradaanu | Paree pudhe aanikaa kaaranu | Vara miravata naahee jee ||

Ovee 152

तेथूनि तुम्ही पुढतपुढती । शिष्य सकळ अगणित मिती । तितुक्यांसी सद्विद्येप्रती । वर किती ओपावा हो ॥

Transliteration

Tethuuni tumhee pudhata-pudhatee | Shishya sakala aganita mitee | Titukyaansee sadvidye-pratee | Vara kitee opaavaa ho ||

Ovee 153

बरें म्हणाल का वाइट । परी वर न ओपु आम्ही स्पष्ट । मानाल तैसें महाश्रेष्ठ । दुःख देहीं आपुल्या ॥

Transliteration

Bare mhanaala kaa vaaitu | Paree vara na opu aamhee spashtu | Maanaala taise mahaa-shreshthu | Duhkha dehee aapulyaa ||

Ovee 154

ऐसें म्हणूनि विमानीं । बैसते झालें तत्क्षणीं । तें जालिंदर दृष्टीं पाहोनी । परम चित्तीं क्षोभला ॥

Transliteration

Aise mhanuuni vimaanee | Baisate jhaale tatkshanee | Tey Jaalindara drishtee paahonee | Parama chittee kshobhalaa ||

Ovee 155

म्हणे माझा अनादर । करुनि जातां स्थानावर । परी माझा चमत्कार । निजदृष्टीं पाहावा ॥

Transliteration

Mhane maajhaa anaadaru | Karuni jaataa sthaanaa varu | Paree maajhaa chamatkaaru | Nija-drishtee paahaavaa ||

Ovee 156

मग करीं कवळूनि भस्मचिमुटी । वातास्त्र प्रेरिता झाला जेठी । तेणेंकरुनि नभापोटी । प्रेरक झालें वातास्त्र ॥

Transliteration

Maga karee kavaluuni bhasma-chimutee | Vaataastra preritaa jhaalaa jethee | Tene-karuni nabhaa-potee | Preraka jhaale Vaataastru ||

Ovee 157

तें वातास्त्र अति तीव्र । प्रगट होतां वातचक्र । तैं सकळ विमानें नभावर । भ्रमण करिती वातानें ॥

Transliteration

Tey Vaataastra ati teevru | Pragata hotaa vaata-chakru | Tai sakala vimaane nabhaavaru | Bhramana karitee vaataane ||

Ovee 158

तें पाहूनियां गंधर्वनाथ । गुणीं गांडीव चढवितां सिद्ध । आदिदेव सुरवरादि समस्त । सज्ज केले सायकें ॥

Transliteration

Tey paahuuniyaa Gandharva Naathu | Gunee Gaandeeva chadhavitaa siddhu | Aadideva suravaraadi samastu | Sajja kele saayake ||

Ovee 159

मग नानास्त्रें जपूनि युक्ती । शर सोडिती नाथावरती । तें पाहूनि जालिंदर जती । निवारण करी सर्वांचें ॥

Transliteration

Maga naanaastre japuuni yuktee | Shara soditee Naathaa varatee | Tey paahuuni Jaalindara jatee | Nivaarana karee sarvaanche ||

Ovee 160

पर्वतास्त्र गंधर्व प्रेरिती । वज्रास्त्र प्रेरी अमरपती । यक्ष अग्निअस्त्रें सोडिती । जळदास्त्र वरुण तो ॥

Transliteration

Parvataastra Gandharva preritee | Vajra-astra preree Amarapatee | Yaksha agni-astre soditee | Jaladaastra Varuna toh ||

Ovee 161

धूमास्त्र अश्विनी देव । नागास्त्र प्रेरिती सकळ दानव । ऐशीं अस्त्रें बहुत गौरव । बहुतांनी तीं निर्मिलीं ॥

Transliteration

Dhooma-astra Ashvinee devu | Naaga-astra preritee sakala daanavu | Aishee astre bahuta gauravu | Bahutaannee tee nirmilee ||

Ovee 162

परी हरि आणि हर । दृष्टीं पाहाती चमत्कार । म्हणती पुढें कैसा विचार । निजदृष्टीं पाहूं कीं ॥

Transliteration

Paree Hari aani Haru | Drishtee paahaatee chamat-kaaru | Mhanatee pudhe kaisaa vichaaru | Nija-drishtee paahoo kee ||

Ovee 163

ऐशी अस्त्रें प्रेरिती बहुत । तें पाहुनि जालिंदरनाथ । मग सकळ अस्त्रांवरी मोहनास्त्र । योजिता झाला महाराजा ॥

Transliteration

Aishee astre preritee bahutu | Tey paahuni Jaalindara-naathu | Maga sakala astraavaree Mohana-astru | Yojitaa jhaalaa Mahaaraajaa ||

Ovee 164

तें मोहन अस्त्रांतरीं । प्रवेशूनि करी प्रताप बाहेरी । जालिंदरातें अवलोकन करी । नमूनि जात असे अस्त्र ॥

Transliteration

Tey mohana astra antaree | Praveshuuni karee prataapa baaheree | Jaalindaraate avalokana karee | Namuuni jaata ase astru ||

Ovee 165

ऐसें अस्त्र सकळ आलें । परी जालिंदरा नमूनि गेलें । परी पर्वतास्त्रें युक्त केलें । निवटिलें वातास्त्र ते ॥

Transliteration

Aise astra sakala aale | Paree Jaalindaraa namuuni gele | Paree parvata astre yukta kele | Nivatile Vaataastra tey ||

Ovee 166

मग विमानें होऊनि स्वर्गी स्थिर । समूळ आटले वातचक्र । मग एकाएक बोलती उत्तर । कैसा विचार करावा ॥

Transliteration

Maga vimaane houuni svargee sthiru | Samoola aatale vaata-chakru | Maga ekaa-eka bolatee uttaru | Kaisaa vichaara karaavaa ||

Ovee 167

जीं जीं अस्त्रें प्रेरितु आपण । तीं तेथें जातीं नमून । तरी आतां शस्त्रें घेऊन । महींलागीं उतरावें ॥

Transliteration

Jee jee astre preritu aapanu | Tee tethe jaatee namuunu | Taree aataa shastre ghevunu | Mahee-laagee utaraave ||

Ovee 168

तीव्र शस्त्रघातेंकरुन । द्वंद्वमुखांते करावें आव्हान । मग तयाचा घेऊन प्राण । स्वर्गवासी करावा तो ॥

Transliteration

Teevra shastra-ghaaten-karunu | Dvandva-mukhaante karaave aavhaanu | Maga tayaachaa ghevuna praanu | Svarga-vaasee karaavaa toh ||

Ovee 169

ऐसें मानलें सर्वा चित्तीं । विमानें उतरली महीवरती । मग मुद्गल फरश अंकुश शक्ती । घेवोनियां धांवले ॥

Transliteration

Aise maanale sarvaa chittee | Vimaane utaralee mahee varatee | Maga mudgala pharasha ankusha shaktee | Ghevoniyaa dhaavale ||

Ovee 170

त्रिशूळ खड्ग भाले तोमर । फरश मुरस पाडू कटयार । गदा चक्र बरची यंत्र । दारुकादि उभवले ॥

Transliteration

Trishoola khadga bhaale tomaru | Pharasha murasa paadoo katyaaru | Gadaa chakra barachee yantru | Daarukaadi ubhavale ||

Ovee 171

गुप्ती भाले असिलता । ऐशी शस्त्रें किती वर्णिता । असंख्यरुपी प्राणहर्ती । घेवोनियां धावलें ॥

Transliteration

Guptee bhaale asilataa | Aishee shastre kitee varnitaa | Asankhya-rupee praanahartee | Ghevoniyaa dhaavale ||

Ovee 172

तें पाहूनि जालिंदर । सोडता झाला कामिनीअस्त्र । कामिनीअस्त्रावरी पवित्र । कामअस्त्र प्रेरिले ॥

Transliteration

Tey paahuuni Jaalindaru | Sodataa jhaalaa Kaaminee-astru | Kaaminee-astraavaree pavitru | Kaama-astra prerile ||

Ovee 173

कामिनीअस्त्र प्रगट होतां । अगणित स्त्रिया तेज मारिता । उदया पावूनि कामवार्ता । दर्शविता रायासी ॥

Transliteration

Kaaminee-astra pragata hotaa | Aganita striyaa teja-marita | Udayaa paavuuni kaama vaartaa | Darshavitaa raayaasee ||

Ovee 174

परी त्या स्त्रिया कैशा । रंभेहूनि शतगुण ऐशा । भ्रुकुटीसायक नेत्रकटाक्षां । शर सोडिती कामाचे ॥

Transliteration

Paree tyaa striyaa kaishaa | Rambhe-huuni shataguna aishaa | Bhrukutee-saayaka netra-kataakshaa | Shara soditee kaamaache ||

Ovee 175

तयामागें कामास्त्र । सर्वां हृदयीं रिघोनि पवित्र । तेणें लंपट होऊनि सर्वत्र । प्रणययुद्धा उसळले ॥

Transliteration

Tayaa maage Kaamaastru | Sarvaa hridayee righoni pavitru | Tene lampata hoouni sarvatru | Pranaya-yuddhaa usalale ||

Ovee 176

मग एकाएकींच्या ध्यानीं । लागूनि करिती नम्र विनवणी । तंव त्या पळती रानोरानीं । हेही धावती त्यामागें ॥

Transliteration

Maga ekaa-ekeenchyaa dhyaanee | Laaguuni karitee namra vinavanee | Tava tyaa palatee raano-raanee | Hehee dhaavatee tyaamaage ||

Ovee 177

परी बद्रिकाश्रमीं बद्रितरु । त्यातें वर्णितां नसे पारु । कीं वाट दावी कंटकापारु । तयामाजी रिघाल्या ॥

Transliteration

Paree Badrikaa-Ashramee badri-taru | Tyaate varnitaa nase paaru | Kee vaata daavee kantakaa-paaru | Tayaa maajee righaalyaa ||

Ovee 178

तंव त्या कामिनी कंटकवनीं । बद्रतरुतें जाती वेधुनीं । देवही तैसे तरु कवळूनी । वृक्षावरी वेंधती ॥

Transliteration

Tava tyaa Kaaminee kantaka-vanee | Badra-tarute jaatee vedhunee | Devahee taise taru kavaluunee | Vrikshaa-varee vendhatee ||

Ovee 179

एक वृक्षावरी एक एकावरी । तैसे एक एक वेंधले तयांवरी । निकट जाऊनि विनंती करी । वश्य होय म्हणवूनि ॥

Transliteration

Eka vrikshaa-varee eka ekaavaree | Taise eka eka vendhale tayaa-varee | Nikata jaauuni vinantee karee | Vashya hoya mhana-vuuni ||

Ovee 180

सकळ वृक्षा गेले वेंधून । तें पाहूनि जालंदर नंदन । मग स्पर्शास्त्र मंत्र जपून । भस्मचिमुटी सोडीतसे ॥

Transliteration

Sakala vrikshaa gele vendhuunu | Tey paahuuni Jaalandara nandanu | Maga Sparshaastra mantra japuunu | Bhasma-chimutee sodeetase ||

Ovee 181

स्पर्शास्त्र प्रगट होतां । सकळ कामिनींसी झाली प्रेरकता । तें पाहूनि कामिनी तत्त्वता । उडद्या सोडिती महीतें ॥

Transliteration

Sparshaastra pragata hotaa | Sakala kaamineensee jhaalee prerakataa | Tey paahuuni Kaaminee tattvataa | Udyaa soditee maheete ||

Ovee 182

तयांच्या मागें देव भले । उडद्या सोडिती अति वहिलें । परी स्पर्शास्त्रें पदातें धरिलें । तरुशाखेतें कवळूनी ॥

Transliteration

Tayaanchyaa maage deva bhale | Udyaa soditee ati vahile | Paree Sparshaastre padaate dharile | Taru-shaakhete kavaluunee ||

Ovee 183

मग खालीं मौळी वरते पद । मध्येंचि लोंबती देववृंद । मुकुट महीतें पडोनि बद्ध । कबरी मोकळी हेलावे ॥

Transliteration

Maga khaalee maulee varate padu | Madhyenchi lombatee devavrindu | Mukuta maheete padoni baddhu | Kabaree mokalee helaave ||

Ovee 184

जैसें सुग्रीव पक्ष्याचें घर । तरुसी लोंबती दिसती अपार । कीं दिनउदयीं शाखेवर । वडकाळिका झोंबती ॥

Transliteration

Jaise Sugreeva pakshyaache gharu | Tarusee lombatee disatee apaaru | Kee dina-udayee shaakhevaru | Vadakaalikaa jhombatee ||

Ovee 185

तन्यायें तरुवरती । देव उफराटे झोळकंबे घेती । तें पाहूनी उमापती रमापती । हास्य करिती गदगदां ॥

Transliteration

Tannyaaye taru varatee | Deva upharaate jhola-kambe ghetee | Tey paahuunee Umaapatee Ramaapatee | Haasya karitee gadagadaa ||

Ovee 186

म्हणती बरवी झाली मौज । ऐसा मिळाला नाहीं भोज । न मारितां सकळ ज्ञानकाज । फेडुनि करपुटी मिरवले ॥

Transliteration

Mhanatee baravee jhaalee mauju | Aisaa milaalaa naahee bhoju | Na maaritaa sakala jnyaana-kaaju | Feduni kara-putee miravele ||

Ovee 187

मग स्त्रियां तळवटीं । काम करित्या झाल्या शेवटीं । सकळांचें चीर फेडूनि करपुटीं । नग्नशरीरी मिरवले ॥

Transliteration

Maga striyaa talavatee | Kaama karityaa jhaalyaa shevatee | Sakalaanche cheera pheduuni karaputee | Nagna-shareeree miravale ||

Ovee 188

सकळ वस्त्रें जालिंदरापासीं । स्त्रिया आणूनि करिती राशी । मग जालिंदर कानिफापाशीं । हळूचि खुणे सांगतसे ॥

Transliteration

Sakala vastre Jaalindaraapaasee | Striyaa aanuuni karitee raashee | Maga Jaalindara Kaaniphaa-paashee | Haloochi khune saangatase ||

Ovee 189

देव सकळ झाले नग्न । त्यांतें नेसवूनि येई वसन । मग तो कानिफा घेऊन वसन । ज्याचे त्यासी नेसवीतसे ॥

Transliteration

Deva sakala jhaale nagnu | Tyaate nesavuuni yeee vasanu | Maga toh Kaaniphaa ghevuna vasanu | Jyaache tyaasee nesaveetase ||

Ovee 190

नेसवितां देव बोलत । अहो गुरुची करणी विपरीत । विध्वंसले असे सामर्थ्य । योग्यायोग्य दिसेना ॥

Transliteration

Nesavitaa deva bolatu | Aho guruchee karanee vipareetu | Vidhvansale ase saamarthyu | Yogyaayogya disenaa ||

Ovee 191

ज्यांची ब्रह्मांडभरी कीर्ति । ते तरुलागीं कैसे लोंबती । ऐसे म्हणूनि तयापरती । वसनालागीं परिधानी ॥

Transliteration

Jyaanchee Brahmaanda-bharee keerti | Tey taru laagee kaise lombatee | Aise mhanuuni tayaaparatee | Vasanaalaagee paridhaanee ||

Ovee 192

म्हणे महाराजा गुरुसी चोरुन । तुम्हां परिधानितों गुप्त वसन । तरी हें ऐसें वर्तमान । बोलूं नका गुरुतें ॥

Transliteration

Mhane Mahaaraajaa gurusee chorunu | Tumhaa paridhaanito gupta vasanu | Taree hey aise vartamaanu | Boloo nakaa gurute ||

Ovee 193

वसन नेसल्या उपरी । पाय वंदी उभय करीं । भाळ ठेवूनी पदावरी । आणिक जात पुढारां ॥

Transliteration

Vasana nesalyaa uparee | Paaya vandee ubhaya karee | Bhaala thevuunee padaavaree | Aanika jaata pudhaaraa ||

Ovee 194

मग कानिफाची नेत्रभक्ती । पाहुनी तुष्टले देव चित्तीं । मग प्रसन्न होऊनि वरदहस्तीं । वरा ओपिती कृपेनें ॥

Transliteration

Maga Kaaniphaachee netra bhaktee | Paahunee tushtale deva chittee | Maga prasanna houuni varada hastee | Varaa opitee kripene ||

Ovee 195

मनीं करुनि दृढ विचार । विना दिधल्यावाचूनि वर । सोडणार नाहीं जालिंदर । कृतनिश्चय हा असे ॥

Transliteration

Manee karuni dridha vichaaru | Vinaa didhalyaa-vaachuuni varu | Sodanaara naahee Jaalindaru | Krita-nishchaya haa ase ||

Ovee 196

ऐसा निश्चय करुनि चित्तीं । प्रसन्न चित्तें वर ओपिती । जें जें अस्त्र तयाचे शक्ती । आम्ही मिरवूं निश्चयें ॥

Transliteration

Aisaa nishchaya karuni chittee | Prasanna-chitte vara opitee | Je je astra tayaache shaktee | Aamhee miravoo nishchaye ||

Ovee 197

मग सकळीं देऊनि वरप्रदान । कानिफा केला वरदवान । तें ऐकूनि पावकनंदन । विभक्तास्त्र सोडीतसे ॥

Transliteration

Maga sakalee deuuni vara-pradaanu | Kaaniphaa kelaa varada-vaanu | Tey aikuuni Paavaka-nandanu | Vibhaktaastra sodeetase ||

Ovee 198

विभक्तास्त्र होतां प्राप्त । सकळ देव झाले मुक्त । सांवरुनि वस्त्रभूषणातें । नाथापाशीं पातलें ॥

Transliteration

Vibhaktaastra hotaa praaptu | Sakala deva jhaale muktu | Saavaruni vastra-bhooshanaate | Naathaa paashee paatale ||

Ovee 199

मग सर्वत्रीं करुनि नमस्कार । म्हणती तव सुता दिधला वर । सकळ अस्त्रीं साक्षात्कार । आम्ही मिरवूं निजांगें ॥

Transliteration

Maga sarvatree karuni namaskaaru | Mhanatee tava sutaa didhalaa varu | Sakala astree saakshaat-kaaru | Aamhee miravoo nijaange ||

Ovee 200

उपरी बोले जालिंदरनाथ । पुढें करीन साबरी कवित्व । त्यातें साह्य तुम्हीं समस्त । कृपा करुनि असावें ॥

Transliteration

Uparee bole Jaalindaranaathu | Pudhe kareena saabaree kavitvu | Tyaate saahya tumhee samastu | Kripaa karuni asaave ||

Ovee 201

मग अवश्य म्हणोनि वचन देती । साह्य असों तव कवितीं । ऐसें बोलोनि स्वस्थाना जाती । विमानारुढ होऊनियां ॥

Transliteration

Maga avashya mhanoni vachana detee | Saahya aso tava kavitee | Aise boloni svasthaanaa jaatee | Vimaanaa-rudha hououniyaa ||

Ovee 202

यावरी रमावर आणि उमावर । कानिफा आणि जालिंदर । बद्रिकाश्रमीं होऊनि स्थिर । तीन रात्र राहिले तेथें ॥

Transliteration

Yaavaree Ramaavara aani Umaavaru | Kaaniphaa aani Jaalindaru | Badrikaa-Ashramee houuni sthiru | Teena raatra raahile tethe ||

Ovee 203

तेथील स्वाद धुंडीसुत । पुढें सांगेल यथास्थित । नरहरिवंशीं नाम ज्यातें । मालू ऐसें वदताती ॥

Transliteration

Tetheela svaada dhundee-sutu | Pudhe saangela yathaasthitu | Narahari-vamshee naama jyaate | Maaloo aise vadataatee ||

Ovee 204

स्वस्ति श्रीभक्तिकथासार । संमत गोरक्षकाव्य किमयागार । सदा परिसोत भाविक चतुर । द्वादशाध्याय गोड हा ॥

Transliteration

Svasti Shreebhaktikathaa Saaru | Sammata Goraksha-Kaavya Kimayaagaaru | Sadaa parisota bhaavika chaturu | Dvaadasha Adhyaaya goda haa ||

श्रीकृष्णार्पणमस्तु । श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ।

Shri Krishnarpanamastu
Shri Dattatreyarpanamastu

इति श्रीनवनाथभक्तिसार द्वादशाध्याय संपूर्ण ।

Iti Shri Navnath Bhaktisar Adhyaya Dvaadasha Sampurnah